आगच्छत् शिक्षार्थम्। निर्गच्छत् सेवार्थम्।

# महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था औरंगाबाद (मिपा)

# School Leadership Academy, Maharashtra

## मोड्यूल क्र.४६

## शाळास्तरावर ग्रंथालयाच्या माध्यमातून वाचन संस्कृती रुजविण्यासाठी शालेय नेतृत्वाची भूमिका

## The Role of School Leadership in Promoting Reading Culture through School Libraries

**प्रस्तावना –**

ग्रंथालय म्हणजे ग्रंथसंग्रहाचे स्थान. अलिकडील काळात ते माहिती किंवा डेटा संग्रहाचे स्थान बनले आहे. माहिती मिळविण्याची गरज अगदी शालेय जीवनापासून निर्माण होते आणि इथेच शालेय ग्रंथालयांची गरज भासते. शालेय स्तरावर विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी ही ग्रंथालये महत्त्वाची भूमिका पार पाडतात. शाळेतील शिक्षक आणि विद्यार्थी या सर्वांना ग्रंथालयात उपलब्ध असलेले सर्व प्रकारचे, विविध विषयांचे आणि विविध माध्यमातील साहित्य वाचण्यास प्रवृत्त करणे आणि आवश्यकतेनुसार किंवा वाचकांच्या मागणीनुसार ग्रंथालयीन सेवा पुरविणे हे शालेय ग्रंथालयांचे प्रमुख उद्दिष्ट असते.

शिक्षणाची जी अनेक उद्दिष्टे आहेत, ती सर्व साध्य करण्यासाठी फक्त पाठ्यपुस्तके पुरी पडत नाहीत. त्यासाठी संदर्भ ग्रंथ, शैक्षणिक अथवा गरजेनुसार संबंधित पूरक वाचनसाहित्य विद्यार्थ्यांपर्यंत पोहचविणे आवश्यक असते आणि हे कार्य शालेय ग्रंथालये विविध सेवांच्या, उपक्रमांच्या सहाय्याने पार पाडू शकते.

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार व RTE 2009 नुसार शालेय ग्रंथालया संदर्भात काही निकष दिलेले आहेत.

- प्रत्येक शाळेत विद्यार्थी व शिक्षक यांचेसाठी ग्रंथालय असावे.
- विद्यार्थी संख्या विचारात घेता विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात (1:5) पुस्तके असावीत.
- प्राथमिक शाळा (कमी पटसंख्या असलेली) असल्यास किमान 200 पुस्तके असावीत.

हे सर्व निकष राज्यातील सर्व व्यवस्थापनाच्या सर्व माध्यमांच्या शाळांकरीता लागू आहेत. केवळ मुंबई शहराचा विचार केला तर येथे एकूण 868 शाळा आहेत.

**मुंबई शहरातील शाळांचा तपशील**

| शाळा प्रकार | शासकीय | समाज कल्याण | खाजगी अनुदानित | अंशतः अनुदानित | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| प्राथमिक व उच्च प्राथमिक | 0 | 0 | 0 | 4 | 4 |
| प्राथमिक, उच्च प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक | 0 | 1 | 1 | 166 | 168 |
| उच्च प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक | 0 | 1 | 0 | 36 | 37 |
| प्राथमिक, उच्च प्राथमिक व माध्यमिक | 5 | 0 | 12 | 433 | 450 |
| उच्च प्राथमिक व माध्यमिक | 0 | 0 | 9 | 105 | 114 |
| फक्त माध्यमिक | 0 | 0 | 0 | 9 | 9 |
| माध्यमिक व उच्च माध्यमिक | 0 | 0 | 0 | 6 | 6 |
| फक्त उच्च माध्यमिक | 0 | 6 | 0 | 74 | 80 |
| एकूण | 5 | 8 | 22 | 833 | 868 |

या 868 शाळांपैकी ग्रंथालयाचा प्रभावी वापर करणाऱ्या, ग्रंथालयाच्या माध्यमातून शिक्षणाची उद्दिष्ट्ये साध्य करण्याचा, वाचन संस्कृती रुजविण्याचा प्रयत्न करणाऱ्या शाळांचे / शालेय नेतृत्वाचे प्रमाण मात्र तुरळक असल्याचे दिसते. म्हणूनच वाचन संस्कृती रुजविण्यासाठी ग्रंथालयाचा प्रभावी वापर करणाऱ्या शालेय नेतृत्वाचा अभ्यास प्रस्तुत मोड्यूलमध्ये केलेला आहे.

## मोडयूल अध्ययनाची उद्दिष्टे –

१. शाळानिहाय ग्रंथालयांची बदलती उद्दिष्टे जाणून घेणे.
२. ग्रंथालयाच्या माध्यमातून वाचन संस्कृती रुजविणाऱ्या शालेय नेतृत्वाचा अभ्यास करणे.
३. वाचन संस्कृती रुजविण्यासाठी शालेय नेतृत्वाचा दृष्टीकोन विकसित करणे

## वाचन संस्कृती संकल्पना -

संस्कृती ही विविध अर्थछटा असणारी संकल्पना आहे. Reading Culture is a climate in which all the society is expected & encouraged to read अशी काहीशी वाचन संस्कृतीची व्याख्या केलेली दिसते.

वाचन संस्कृतीचा सदस्य हा साक्षर असतो आणि म्हणूनच ती निव्वळ वाचन इतक्यापूर्तीच मर्यादित न राहता, वाचलेल्या साहित्यावर चिंतन करून त्यातून निर्माण होणारा स्वतःचा विचार अशी होते. या सर्व प्रक्रियेत निर्माण होणारी सकारात्मकता व्यक्तीला, समाजाला देणे हा वाचनसंस्कृती मागील मूळ हेतु आहे.

कालानुरूप संस्कृतीमध्ये बदल होत असतात, बदल झाला म्हणजे संस्कृती बिघडली असे म्हणता येत नाही. काही बदल हे चांगले असतात. त्यामुळे केवळ बदल झाला म्हणून ओरड करणे योग्य नाही. सध्या वाचन संस्कृतीही अशा प्रकारच्या बदलाला सामोरी जात आहे. पारंपरिक पद्धतीने मुद्रित स्वरूपातील पुस्तके किंवा साहित्य वाचण्याचे प्रमाण काहीसे कमी झालेले असले तरी वाचनासाठी ई–माध्यमांचा वापर करण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढलेले दिसते. वाचनाचे माध्यम बदलत असले तरी वाचन संस्कृती मात्र हळू हळू कमी होत चालली आहे हे नक्की.






निर्दोष व कौशल्यपूर्ण वाचन हा वाचन संस्कृतीचा महत्वपूर्ण पैलू आहे. जे वाचले त्यावर स्वतःचा विचार, दृष्टीकोन बनविता आला पाहिजे आणि तो योग्य शब्दात, योग्य पद्धतीने व्यक्तही करता आला पाहिजे. वाचन करणे म्हणजे लिहिलेले डोळ्याने पाहून ओळखणे इतकेच अभिप्रेत नाही. ज्ञान मिळविणे, रसिकता निर्माण होणे, आनंद प्राप्ती, संस्कार अशी वाचनाची मुख्य उद्दिष्ट्ये आहेत. यासाठी शासन स्तरावरून विविध उपक्रम राबविले जातात.

डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त १५ ऑक्टोबर रोजी वाचन प्रेरणा दिन साजरा केला जातो. प्रत्येक विद्यार्थाला शालेय पुस्तकांच्या वाचनाच्या बरोबरीने अवांतर वाचनाची आवड निर्माण व्हावी यासाठी प्रयत्न केला जातो. म्हणूनच वाचन प्रेरणा दिनामुळे विद्यार्थाचा व्यक्तिगत विकास होण्यास आणि त्यांच्यामध्ये वाचन संस्कृती रुजविण्यास मदत होते.

यासह राज्य शैक्षणिक संशोधन परिषद, महाराष्ट्र, पुणे यांचेकडून निपुण भारत अभियान अंतर्गत राबविलेले १०० दिवस वाचन अभियान किंवा गोष्टीचा शनिवार असे उपक्रमही वाचन संस्कृती रुजविण्यासाठी पूरक ठरत आहेत.

असे असले तरी, प्रत्यक्षात मात्र शाळास्तरावर ग्रंथालये आणि वाचन संस्कृती याबाबत एक प्रकारची उदासीनता दिसून येते. एखाद्या खोलीतील काही कपाटांमध्ये ठेऊन दिलेली पुस्तके म्हणजे ग्रंथालय होऊ शकत नाही. ग्रंथालयातील पुस्तकाची किंवा गहाळ पुस्तकांची नोंद घेतली, मुलांना पुस्तकाची निव्वळ देव-घेव केली म्हणजे ग्रंथालयाचे काम पार पडले असे नाही. वाचनसंस्कृतीच्या माध्यमातून शिक्षणाची उद्दिष्टे पार पाडण्यासाठी शालेय ग्रंथालयांनी कार्यरत असले पाहिजे.

## वाचन संस्कृती रुजविताना शालेय नेतृत्वासमोर असलेली आव्हाने –

टी.व्ही., रेडीओ, इंटरनेट, फेसबूक, व्हॉटस्ॲप यासारख्या आधुनिक करमणुकीच्या प्रसार माध्यमांच्या प्रभावामुळे सर्वत्रच मोठ्या प्रमाणावर वाचन संस्कृतीची पीछेहाट झाल्याचे दिसते. या दृकश्राव्य माध्यमांच्या अतिरेकामुळे पुस्तकांचा वाचक वर्ग दुरावला आहे.

बरेचदा वाचलेल्या साहित्यावर चिंतन, मनन करून तो विषय आत्मसात करणे, त्यावर स्वतःचे मत बनविणे व ते व्यक्त करणे या सर्वांची विद्यार्थ्याला सवय नसते. त्यामुळे वाचनाचा कंटाळा यायला लागतो. या सर्व पार्श्वभूमीवर शाळास्तरावरील हा वाचक वर्ग टिकवून, त्याच्या वाचन सवयी वृद्धिंगत करून शिक्षणाची उद्दिष्ट्ये साध्य करण्याचे मोठे आव्हान शालेय नेतृत्वासमोर असते.

१. **विद्यार्थ्यांशी संबंधित आव्हाने –**

- शहरी वातावरणातील शाळांमध्ये विशेषतः जिथे पालक सुशिक्षित आहे मात्र तरीही मुलांमध्ये फारशी वाचनाची आवड नाही अशा ठिकाणी ई-माध्यमे, मोबाईल यासारख्या साधनांचा अती वापर, तसेच उपलब्ध सेवा-सुविधांचा अतिरेक यामुळे वाचन संस्कृतीची पीछेहाट होताना दिसते.
- पाडा किंवा गावकुसांतील शाळांमध्ये विशेषतः जिथे पालक अशिक्षित किंवा कमी शिकलेले आहेत तिथे घरातून वाचनाची फारशी परंपराच नाही. अशा शाळांमध्ये वाचन संस्कृती वाढविणे हे आव्हान असते.
- प्रामुख्याने मुलांचा कल हा मैदानी खेळ, शारीरिक कसरती यांच्याकडे असतो अशा वेळी खेळाबरोबरीने वाचन संस्कृती रुजविण्याचे म्हणजे शारीरिक विकासासह बौद्धिक विकासाचे महत्व रुजविण्याचे आव्हान शालेय नेतृत्वासमोर असते.

| विद्यार्थी आव्हाने |
|---|
| **ई-साधनांचा अतिरेक** |
| **वाचन परंपरेचा अभाव** |
| **खेळाकडे असणारा कल** |
| **पालकांचा दृष्टीकोन** |

- मुलांवर पालकांकडून निर्माण होणारा अभ्यासाचा ताण. आजच्या स्पर्धेच्या युगात व परीक्षाकेंद्री शिक्षण पद्धतीत टिकून रहाण्यासाठी अवांतर वाचनात विद्यार्थ्याने वेळ न घालवता तो शालेय अभ्यासासाठी द्यावा अशी पालकांची धारणा असते. ती कमी करून वाचनाचे महत्व पटवून देणे हे एक आव्हान शालेय नेतृत्वासमोर असते.

२. **भाषिक आव्हाने –**

- विद्यार्थ्यांमध्ये निकोप वाचन सवयी रुजविणे - अक्षरांचे चुकीचे उच्चारण, जसे न व ण, चुकीच्या जागी शब्द तोडून वाचणे ई.
- शब्दसंपत्तीचा अभाव – वाचलेले समजत नाही. त्यामुळे वाचनाची गोडी लागत नाही आणि त्यामुळे परत शब्दसंपत्ती वाढत नाही.
- वाचन आकलन समस्या
- प्रमाण भाषा आणि विद्यार्थ्यांची बोली भाषा यामध्ये असलेल्या फरकामुळे वाचलेले आत्मसात करणे विद्यार्थ्याला कठीण जाते.

| भाषिक आव्हाने |
|---|
| **निकोप वाचन सवयी रुजविणे** |
| **शब्द संपतीचा अभाव** |
| **आकलन समस्या’** |
| **प्रमाण भाषा व बोली भाषा यातील फरक** |

या सर्व गोष्टींमुळे विद्यार्थी वाचन करणे टाळतात यावर मात करून त्यांच्यात वाचनाप्रती आवड निर्माण करणे हे शालेय नेतृत्वासमोर आव्हान असते.

मुख्याध्यापकांशी संबंधित आव्हाने –

- आर्थिक समस्या – बरेचदा ग्रंथालयाला प्राप्त होणारे अनुदान आणि ग्रंथालयीन सेवा पुरविण्यासाठी येणारा खर्च यांचे असणारे व्यस्त प्रमाण याचा ताळमेळ बसविणे हे शालेय नेतृत्वासमोर आव्हान असते.
- पुस्तके खराब झाली, फाटली तर ती एक आर्थिक बाब आहे. या भीतीपोटी विद्यार्थ्यांना जास्त किमतीची पुस्तके उपलब्ध करून न देणे किंवा ती व्यवस्थित हाताळण्याबाबत वारंवार सूचना देणे या प्रकारचा दृष्टिकोनही वाचन संस्कृतीला मारक ठरतो.

| मुख्याध्यापक आव्हाने |
|---|
| **आर्थिक समस्या** |
| **दृष्टिकोनाचा अभाव** |

या सर्वांबरोबर आपल्याला प्रकर्षाने जाणवणारी बाब म्हणजे, शहरी भागातील नवीन पिढीमध्ये मुद्रित स्वरूपातील पुस्तके वाचण्याऐवजी ई-माध्यमाद्वारे उपलब्ध होणारी माहिती वाचण्याची सवय जास्त प्रमाणात दिसून येते तर गाव स्तरावरील किंवा वाड्या वस्तीवरील शाळेतील विद्यार्थ्यांचा कल हा पुस्तके किंवा मुद्रित साहित्य वाचण्याकडे असल्याचे दिसून येते. समाजात होणाऱ्या या बदलाला सध्या ग्रंथालयांनाही सामोरे जावे लागते आहे. त्यामुळे वाचन संस्कृती टिकविण्यासाठी ग्रंथालयांनी आपला वाचक व त्याच्या सवयी जाणून घेऊन त्यानुसार वाचन साहित्य उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. हे शालेय नेतृत्वासमोर एक महत्वाचे आणि मोठे आव्हान आहे.

जिल्हा स्तरावरून गेली 13 वर्षे ग्रंथपाल म्हणून काम करताना ग्रंथालयाच्या दृष्टीने काही शाळा पहाण्याची संधी मिळत गेली. नवनवीन तंत्रज्ञानामुळे आणि दररोज निर्माण होणाऱ्या माहितीमुळे बदलत जाणारी शालेय ग्रंथालयांची भूमिका बघत असताना शिक्षणाच्या प्रवाहात शालेय ग्रंथालयांचा प्रभावी वापर झाला पाहिजे असे कायमच वाटत होते.

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, ठाणे येथे काम करत असताना सर्वांच्या सहकार्याने काही संधी उपलब्ध होत होत्या. त्यातच कोव्हिड-19 च्या पार्श्वभूमीवर आम्ही ज्ञानदालन – एक ई माहितीस्त्रोत हा उपक्रम WhatsApp च्या माध्यमातून घेतला. या संपूर्णतः ई-माध्यमाद्वारे घेतलेल्या उपक्रमाला संस्थेच्या वाचकांकडून मिळालेला प्रतिसाद पाहून याची पुस्तिकाही तयार केली. भित्तिपत्रिका, वाचन-लेखन कौशल्याच्या अनुषंगाने कार्यशाळा घेणे हे चालूच होते. वाचता वाचता लिहित्या झालेल्या वाचकांना आणखी एक व्यासपीठ निर्माण करून द्यावे या विचारातून वाचनकुंभ या अंकाची निर्मितीही केली. पर्यावरणासारख्या विषयांवर घडीपत्रिका केली.

या वर्षी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांनी राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धेत ग्रंथपालांना नवोपक्रम सादर करण्याची संधी दिली. आणि मी ज्ञानदालन – एक ई माहितीस्त्रोत हा नवोपक्रम विभागस्तरावर सादर केला. या स्पर्धेत यशही मिळले. इथेच ज्ञानसंपदा हायस्कूल, गोवंडी या शाळेच्या ग्रंथपाल सौ. शरयू देसाई आणि माझी ओळख झाली. या स्पर्धेसाठी त्यांनी सादर केलेला नवोपक्रम आणि शाळास्तरावर घेतलेले विविध उपक्रम वाचल्यावर या शाळेला एकदा तरी भेट द्यावी असे वाटत होते. म्हणून मग ग्रंथालय पहाण्यासाठी आणि त्यांनी केलेले विविध उपक्रम जाणून घेण्यासाठी आवर्जून मी या शाळेला भेट दिली.

मुख्याध्यापक, शिक्षक आणि ग्रंथपाल यांच्यामध्ये सुसंवाद असेल तर शिक्षणाची मुख्य उद्दिष्ट्ये पूर्ण करण्यासाठी शालेय ग्रंथालये किती प्रभावी भूमिका बाजावू शकतात याचे उत्तम

उदाहरण असणाऱ्या या शाळेचे काम, ग्रंथपाल आणि त्यांना साथ देणाऱ्या शालेय नेतृत्वाची भूमिका सर्वांसमोर यावी या विचारातून हे मोडयूल विकसित करण्यात आले आहे.

## यशोगाथा

### मुख्याध्यापकाचे नाव – श्री. लक्ष्मण गुंडा गडदे


### शाळेचे नाव – ज्ञानसंपदा हायस्कूल, शिवाजीनगर गोवंडी, मुंबई – ४३

श्री. लक्ष्मण गुंडा गडदे हे मूळचे सांगली जिल्हयातील जत तालुक्यामधील बाज या गावचे रहिवाशी. 1988 साली ते गोवंडी, मुंबई येथील ज्ञानसंपदा हायस्कूल येथे सहाय्यक शिक्षक म्हणून रुजू झाले. इंग्रजी हा त्यांचा विषय असल्याने 8 वी ते 10 वीच्या वर्गांना त्यांनी इंग्रजीचे अध्यापन करण्यास सुरुवात केली. सन 1990-91 मध्ये ही शाळा अनुदानीत झाली. यासाठीही त्यांनी दिलेले योगदान महत्वाचे. त्यानंतर 2007 साली पर्यवेक्षक तर 2008 ला सहाय्यक मुख्याध्यापक अशी पदे भूषवत 2017 पासून ते या शाळेत मुख्याध्यापक म्हणून कार्यरत झाले. मुख्याध्यापक होण्यापूर्वी मागील 29 वर्षे ते या शाळेत कार्यरत असल्यामुळे येथील विद्यार्थी, आजूबाजूचा समाज याबाबत त्यांना माहिती होती. शाळेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांशी त्यांचा परिचय होता, या सर्वांच्या कला-गुणांची, क्षमतांची त्यांना पूर्व कल्पना होती. याचा फायदा त्यांना मुख्याध्यापक झाल्यावर झाला.

शिक्षणाची उद्दिष्टे पूर्ण करायची असतील तर वाचन संस्कृती रुजविणे, वृद्धिंगत करणे हे अत्यंत महत्वाचे आहे. याची पूर्ण जाणीव सरांना होती म्हणून मग त्यांनी या दृष्टीने वाटचाल करण्यास सुरुवात केली. त्यांच्या या प्रयत्नात त्यांना शाळेच्या ग्रंथपाल सौ. शरयू गोपाळ देसाई यांची मदत मिळाली. त्या या शाळेत गेली 29 वर्षे ग्रंथपाल म्हणून कार्यरत आहेत. शाळेत वाचन संस्कृती रुजविण्यात सरांइतकीच ग्रंथपाल मॅडम यांचीही भूमिका, सहकार्य व काम करण्याची तळमळ मोलाची. शालेय ग्रंथालयाचा मुलांच्या विकासासाठी प्रभावी वापर त्या करत होत्याच. आता त्यांना शालेय नेतृत्वाचीही साथ मिळाली आणि दोघांनी मिळून या शाळेतील विद्यार्थी, शिक्षक यांच्यामध्ये वाचन संस्कृती रुजवली आणि ती वाढवली सुद्धा. शाळेच्या विकासात ग्रंथालय किती प्रभावी भूमिका पार पाडू शकते याचे उत्तम उदाहरण म्हणजे ज्ञानसंपदा हायस्कूल. या शाळेची स्थापना 1983 साली स्वर्गीय साहेबराव देशमुख यांनी केली.

ज्ञानसंपदा हायस्कूल ही मुंबई उपनगरातील शिवाजी नगर या भागातील एक मराठी माध्यमाची 5 वी ते 10 वी पर्यंतची शाळा. सन 2022-23 या वर्षातील शाळेचा एकुण पट 676 इतका आहे. आजूबाजूचा भाग हा काहीसा झोपडपट्टी किंवा गरीब वस्ती असणारा. त्यामुळे येथील सुमारे 60 % पालक वर्ग हा अशिक्षित किंवा कमी शिकलेला. साहजिकच येथील विद्यार्थ्यांवर घरातून वाचनाचे संस्कार होण्याचे प्रमाण कमीच होते. त्यात ही शाळा मुंबईपासून जवळ त्यामुळे टी.व्ही., रेडीओ, व्हॉटस्ॲप यासारख्या आधुनिक करमणुकीच्या प्रसार माध्यमांचा प्रभाव मात्र येथील बहुतांशी विद्यार्थ्यांवर होता. त्यामुळे घरातून वाचनाची फारशी परंपराच नाही आणि करमणुकीच्या ई-माध्यमाचा अतिवापर अशा दोन्ही समस्यांच्या पार्श्वभूमीवर वाचन संस्कृती रुजविण्याचे मोठे आव्हान शालेय नेतृत्व व ग्रंथपाल यांच्यावर होते. या सर्व समस्या जाणवल्यावर मुख्याध्यापक व ग्रंथपाल या दोघांनी मिळून विविध उपक्रम राबविण्यास सुरुवात केली.


1. **वर्ग वाचनालय –**




पुस्तके वाचा किंवा ग्रंथालयाचा वापर करा असे वारंवार सांगूनही काही ठराविक मुले वगळता इतरांचा ग्रंथालयाकडे येण्याचा कल कमीच होता. शाळेतील प्रत्येक विद्यार्थ्यांच्या दप्तरात गोष्टीचे किमान एक तरी पुस्तक असावे अशी मॅडमची तळमळ होती. याकरीता मग वर्ग वाचनालयाचे नियोजन करण्यात आले. याला " स्मार्ट मुलांसाठी स्मार्ट पुस्तके " असे नाव दिले. एका बॉक्समध्ये वर्गातील मुलांच्या पट संख्येइतकी पुस्तके ठेऊन ती वर्ग प्रतिनिधींच्या मार्फत वर्गात दर आठवड्याला वितरित करण्यास सुरूवात केली. पण नुसतेच वितरित करून चालणार नव्हते, मुलांनी ते वाचायला हवे. म्हणून मग या उपक्रमात वर्ग शिक्षकांचा सहभाग घेण्यात आला. वितरित केलेले पुस्तक वाचून झाले की परत करताना त्या पुस्तकाबाबत प्रत्येक मुलाला आपले मत मांडण्यास सांगण्यात येते. यामुळे मुलांनी पुस्तक वाचले आहे की नाही हे तर समजतेच पण त्याच बरोबरीने त्यावर विचार करून, मत व्यक्त करण्याची सवयही लागते.

नव्याने शाळेत दाखल झालेले म्हणजे ई. 5 वी, 6 वी चे विद्यार्थी सुरुवातीच्या काळात या उपक्रमात सहभागी होताना, व्यक्त होताना अडखळतात मात्र हळू हळू त्यांच्यात वाचन, चिंतन, मनन यासह योग्य शब्दात व्यक्त होण्याचे कौशल्य निर्माण होते.

2. **लेखकास पत्र –**


॥ श्री ॥
DATE 15/01/2021

कु. श्वेतास,
अनेक शुभाशिर्वाद

प्रथम तुझं आणि तुझ्या शालेचं कौतुक. 'लेखकास पत्र' अतिशय सुंदर कल्पना! एका विद्यार्थिनीचे पत्र आलेले पाहून खूपच कुतूहल वाटलं. कारण पहिल्यांदाच लेखिका या नात्याने विद्यार्थिनीला पत्राचे उत्तर देण्याची पहिलीच वेळ आणि तुमची पिढी पण दिवाळी अंक वाचतेय याचे.


'मोडीदर्पण' वाचलास आणि एका लेखकाला पत्र लिहावे असे तुला वाटले ही गोष्ट जास्त मला आवडली. असो.

मोडीदर्पणमधील तुला मोडीलिपी कशी लिहावी वाचावी हे समजले आणि विशेष म्हणजे तू प्रयत्नही करतेस त्याबद्दल भारी वाटलं. शिवरायांच्या विषयीचे लेखही तुला आवडलेत. आणि विशेष तुला "काखखेलीवरील फूल" हा माझा लेख खूप भावला असे म्हटलेस. खरंच सायली दिव्यांग विद्यार्थिनी असूनही आत्मविश्वासाच्या बळावर तिने उच्च शिक्षण पूर्ण केले. कधीही खचली नाही. ही गोष्ट खरं प्रेरणादायी आहे. तिच्यावर आधारित 'उमलू द्या कळ्यांना' हे नाटकही तुला पाठवते. बघ आवडते का? उत्तर पाठवून कळव आणि हो तुला 'काखखेलीवरील फूल' म्हणजेच सायलीचा नंबर हवा होता न, 7304368602 या नंबरवर फोन कर. असेच उत्तमोत्तम साहित्य वाचत जा लिहित जा. तुझ्या बाईंना हा उपक्रम मला आवडला हे नक्की सांग (मोबाईलच्या दुनियेतून पत्राच्या जगात नेले)

9223362293

मुलं वाचती झाली, लिहिती झाली पण आता त्यांचे हे कौशल्य फक्त शाळास्तरावर मर्यादित ठेऊन चालणार नाही. त्यांना अधिकाधिक वाव मिळाला पाहिजे या विचारातून विद्यार्थ्यांनी वाचलेल्या पुस्तकावर आपल्या आवडत्या लेखकास पत्र लिहिण्यासाठी प्रोत्साहित करण्यात आले. मोबाईलच्या जमान्यात त्या पत्रास लेखकाकडून मिळालेले उत्तर या मुलांना अवर्णनीय आनंद देऊन जाते.

3. **साहित्यिक, वैज्ञानिक यांचा परिचय–**



हा उपक्रम सन 2017 पासून ग्रंथालयामध्ये राबविला जातो. दर महिन्याला साधारणतः दहा साहित्यिक, वैज्ञानिकांचे फोटो, त्यांचे नांव, टोपण नांव अशी माहिती ग्रंथालयामध्ये प्रदर्शित केली जाते. यामुळे साहित्यासह इतर क्षेत्रांची व त्या क्षेत्रांमध्ये काम करणाऱ्या मान्यवरांची मुलांना ओळख होते.

### 4. ग्रंथालयास पुस्तक भेट–



विद्यार्थी वाढदिवसाच्या निमित्ताने शाळेमध्ये खाऊ वाटप करतात, त्याऐवजी शक्य असल्यास एखादे पुस्तक ग्रंथालयास भेट देण्याचे आवाहन मुलांना करण्यात आले. हळूहळू मुलांकडून अशी पुस्तक भेट देण्यास सुरवात झाली. यातूनच वाचन कोपरा आणि वर्ग वाचनालयाची निर्मिती शाळेने केली आहे. वाचनसाहित्य खरेदीसाठीच्या आर्थिक समस्येवर तोडगा काढण्यास अशा उपक्रमांद्वारे मदत होते. आता विद्यार्थी मित्र-मैत्रिणीनाही वाढदिवसाच्या शुभेच्छा पुस्तक रूपाने देतात.

### 5. पुस्तक प्रदर्शन व व्यास प्रकाशन–



ऑगस्ट क्रांती दिन, वाचन प्रेरणा दिवस आणि मराठी व विज्ञान दिन या निमित्ताने वर्षातून तीन वेळा शाळेच्या ग्रंथालयातील पुस्तकांचे प्रदर्शन भरविले जाते. यामुळे ग्रंथालय शास्त्राच्या पांच सिद्धांतांपैकी दोन सिद्धांतांची, '1. प्रत्येक पुस्तकास त्याचा वाचक मिळाला पाहिजे आणि 2. प्रत्येक वाचकास त्याचे पुस्तक मिळाले पाहिजे.' पूर्तता होण्यास मदत होते.

वाचन प्रेरणा दिनाच्या निमित्ताने होणाऱ्या पुस्तक प्रदर्शनामध्ये डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या पुस्तकाचा प्रामुख्याने समावेश केला जातो. या सर्व दिवशी पुस्तक खरेदी विक्रीचे स्टॉल लावले जातात.

व्यास क्रियेशन प्रकाशनातर्फे शाळेमध्ये वेगवेगळया लेखकांच्या पुस्तकाचे प्रकाशन आयोजित केले जाते.

### 6. शाळेचे विद्यार्थी साहित्य मंडळ–



विद्यार्थ्यांच्या सहभागाने ग्रंथालयाने साहित्य मंडळाची निर्मिती केली आहे. उत्तम वाचक तसेच सर्वात जास्त पुस्तके वाचलेला विद्यार्थी व त्याच्या पालकांना बक्षीस स्वरूपात पुस्तक भेट दिले जाते. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये पुस्तक वाचनाची स्पर्धा लागलेली असते.

7. **विविध उपक्रमांचे आयोजन –**

विद्यार्थ्यांकरीता कथाकथन, कथालेखन, कथावाचन, चित्रावरून कथालेखन, काव्यवाचन, अभिवाचन, नाट्य वाचन, लेखन व सादरीकरण, वक्तृत्व, निबंध लेखन, विविध कार्यक्रमांचे निवेदन व सादरीकरण यासारखे उपक्रम वर्षभर चालू असतात. यासाठी मान्यवरांचे मार्गदर्शनही मुलांना दिले जाते. या सर्व स्पर्धांचे आयोजन वर्षभरात काही विशेष दिनांचे औचित्य साधून केले जाते. मुलांच्या भाषिक समस्या कमी करणे, त्यांचा व्यक्तिमत्व विकास यासाठी तर हे उपक्रम उपयुक्त ठरतातच पण याशिवाय एक सामाजिक भान त्यांच्यात निर्माण होते,

शाळेमध्ये 'कथा स्वातंत्र्याची 1942 च्या उठावाची' असा उपक्रम 2018 पासून दरवर्षी घेण्यात येतो. यामध्ये स्वातंत्र्य सेनानींची प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांच्या मुलाखती घेतल्या जातात. याद्वारे विद्यार्थ्यांमध्ये इतिहासाप्रती, स्वातंत्र्य चळवळीविषयी जागरूकता निर्माण होते. या कार्यक्रमास शाळेच्या माजी विद्यार्थ्यांचेही योगदान लाभले आहे.

संस्थेचे संस्थापक कै. साहेबरावजी देशमुख यांची जयंती, मराठी राजभाषा दिन व विज्ञान दिन शाळेत मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. या निमित्ताने विविध विषयांवरील व्याख्याने, अंधश्रद्धा निर्मूलनाचे प्रयोग यांचे आयोजन जनजागृतीसाठी आवर्जून केले जाते.

8. **नाट्य शिबिराचे आयोजन–**

या उपक्रमामुळे मुलांच्या भाषिक समस्या जाणून घेऊन त्याचे निराकरण करणे शक्य झाले. कथाकथन, नाट्यवाचन, अभिवाचन याची ओळख आणि या सर्वांच्यातील फरक विद्यार्थ्यांच्या लक्षात आला,यामुळे विद्यार्थ्यांना वाचनाचे प्रकार समजले.






या शिबिरानंतर शाळेने 1) राज्यस्तरीय बालनाट्य स्पर्धा, 2) महाराष्ट्र जवाहर बालभवनचा बाल महोत्सव, 3) उत्कर्ष एकांकिका स्पर्धा, 4) कामगार कल्याण बाल नाट्य स्पर्धा अशा नामांकित स्पर्धांमध्ये प्रथमच सहभाग घेतला व प्राविण्य मिळविले.

## 9. 100 दिवस वाचन उपक्रम–



सन 2021-22 मध्ये घेण्यात आलेल्या उपक्रमात कथाकथन, नाट्य, नृत्य, एकपात्री, नाट्य स्वरूपात ऐतिहासिक घोषवाक्य यासह पाककला, फळा फुलांची ओळख आणि त्यांची वैशिष्ट्ये अशा वेगवेगळ्या उपक्रमांचा अंतर्भाव केला होता. मुलांनी या उपक्रमाचा पुरेपूर आनंद लुटला.

**या सर्व उपक्रमांचा परिणाम म्हणून विद्यार्थी वाचन, लेखन, सादरीकरण यासारख्या कला-गुणांमध्ये पारंगत होताना दिसतात. पुढील काही उपक्रमातून ही बाब आवर्जून जाणवते.**

मागील पांच वर्षातील ग्रंथालयास भेट देणाऱ्या वाचकांची वर्षनिहाय संख्या (वर्ग वाचनालये वगळता)

| शैक्षणिक वर्ष | 2018-19 | 2019-20 | 2020-21 | 2021-2 | 2022-23 |
|---|---|---|---|---|---|
| ग्रंथालयीन वाचक संख्या | 1930 | 1970 | कोव्हिडमुळे शाळा बंद | 410 (कोव्हिडमुळे फेब्रु. 2022 मध्ये शाळा सुरू झाली) | 1795 |

## 10. साहित्य संमेलनात मुलांचा सहभाग–



पोएट्री मॅरेथॉन, ठाणे यांनी आयोजित केलेल्या बाल काव्य संमेलनात व राजापूर येथील ग्रामीण साहित्य संमेलनात विद्यार्थ्यांनी स्व:लिखित कविता सादर करून आयोजकांची व प्रेक्षकांची मने जिंकली.

## 11. कथाक्वीस्ट–

यात पांच देशातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. यामध्ये शाळेतील विद्यार्थ्यांनी 'प्रीतम' नावाची कथा ऑनलाइन माध्यमातून सादर केली.

## 12. आम्ही सारे बालकलाकार–

या नावाने YouTube चॅनल विद्यार्थ्यांनी तयार केले आहे. या चॅनेलवर विद्यार्थ्यांनी सादर केलेले विविध कार्यक्रम आहेत.

याची लिंक : https://youtube.com/@user-kz1ww6db8f

### 13. विद्यार्थ्यांचे प्रकाशित साहित्य –


मराठी राजभाषा दिना प्रित्यर्थ दरवर्षी मुलांच्या स्व व हस्तलिखित कवितांचे प्रकाशन करण्यात येते. याशिवाय विद्यार्थ्यांच्या कथा व कवितांचे संग्रह प्रकाशित झाले आहेत. तसेच शाळेच्या अनेक माजी विद्यार्थ्यांचे कथा व कविता संग्रह, नाटके व कादंबरी असे साहित्यही प्रकाशित झालेले आहे.

हे सारे उपक्रम वरकरणी वेगवेगळे वाटत असले तरी ते एकमेकांशी जोडलेले आहेत. वेगवेगळया विषयांवरील पुस्तके मुलांकडून वाचून व्हावीत, त्यावर त्यांनी विचार करावा, त्यातील मुद्दे/विचार/घटना लक्षात ठेवाव्यात असे प्रयत्न मुख्याध्यापक गडदे सर व ग्रंथपाल देसाई मॅडम यांनी केले आहेत आणि त्यात त्यांना यशही मिळाले आहे.

### प्राप्त पुरस्कार –

- साद माणुसकीची या संस्थेमार्फत शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल ग्रंथपाल शरयू देसाई यांना गौरव पुरस्कार मिळाला. तसेच सन 2020 मध्ये राज्यस्तरीय आदर्श ग्रंथपालक, ग्रंथमित्र सेवारत्न पुरस्कार.




SHIVAJI BHOSALE EDUWORLD

राज्यस्तरीय ONLINE

शिवाजी भोसले एज्युवर्ल्ड

कविता गायन स्पर्धा २०२२

गौरवपत्र

ज्ञानसंपदा हायस्कूल, शिवाजी नगर गोवंडी, मुंबई 400043

SHIVAJI BHOSALE EDUWORLD Youtube Channel आयोजित राज्यस्तरीय कविता गायन स्पर्धा २०२२ या स्पर्धेमध्ये आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांनी सक्रीय सहभाग नोंदवून उल्लेखनीय यश संपादन केल्याबद्दल आपल्या शाळेस हे गौरवपत्र सन्मानपूर्वक देण्यात येत आहे.

दि. १९-०२-२०२२

SHIVAJI BHOSALE EDUWORLD



- सन 2022 मध्ये कविता गायन स्पर्धेमध्ये या शाळेतील विद्यार्थ्यांनी यश संपादन केल्याबद्दल शाळेस गौरव पत्र देण्यात आले.
- 2022 उत्कर्ष एकांकिका स्पर्धेमध्ये अभिनयाबद्दल पुरस्कार.
- यासह दरवर्षी संस्था व शाळेकडून बाल साहित्यिकांना बक्षीस देऊन गौरविण्यात येते.

### चिंतनात्मक प्रश्न -

- केवळ विद्यार्थी नाही तर शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी हे सुद्धा शालेय ग्रंथालयाचे वाचक आहेत. तेव्हा विद्यार्थ्यांबरोबरीने या सर्वांमध्ये वाचन संस्कृती वाढविण्यासाठी नेमके काय करणे आवश्यक आहे?
- बहुभाषिक शाळांमधील विद्यार्थ्यामध्ये वाचनाची आवड निर्माण करून त्यांना प्रमाण भाषेकडे नेण्यासाठी काय करता येईल? असे तुम्हाला वाटते.
- वाचन संस्कृतीच्या अनुषंगाने शाळास्तरावर आकारित मूल्यमापनाचा कसा प्रभावी वापर करून घेता येईल यावर तुमची प्रतिक्रिया द्या.
- शाळेच्या ग्रंथालयासाठी वाचनसाहित्य खरेदी करताना तुम्ही कोणकोणते निकष लावाल?

### विचार करूया चर्चा करूया –

- शाळेतील विद्यार्थ्यांचा कल हा वाचनापेक्षा खेळाकडे अधिक प्रमाणात असतो. विद्यार्थी विकासासाठी क्रीडा व वाचन या दोन्ही गोष्टी महत्वाच्या आहेत. अशावेळी या दोन्हींमध्ये समन्वय साधून विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड रुजविण्यासाठी तुम्ही काय कराल.
- पाठ्यपुस्तक हा एखादा विषय किंवा घटक शिकविण्याचा एक संदर्भ आहे. मुलांना त्या विषयाची गोडी लागून त्यातील अधिक माहिती मिळविण्यासाठी त्यांना उत्तेजन दिले पाहिजे. यासाठी अभ्यासक्रम शिकविताना ग्रंथालयाचा संदर्भीय वापर करणे हे शिक्षकांच्या अभ्यासक्रम शिकविण्याच्या पद्धतीत कसे समाविष्ट करता येईल याचा विचार प्रत्येक विषयाच्या शिक्षकांनी करावा.
- समाजातील सर्व व्यक्ती मिळून संस्कृती बनते. त्यामुळे केवळ विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कृती निर्माण करून भागणार नाही त्यात पालकांचाही समावेश आवश्यक आहे. यासाठी पालक व विद्यार्थी यांच्यामध्ये काही संयुक्त उपक्रम राबविणे शक्य होईल का? शक्य असल्यास कोणते व ते कसे राबवावेत यावर विचार करूया.

### वाचन संस्कृती वाढविण्यासाठी असेही करता येईल (काही उदाहरणे) –


- मुलांनी नाट्य स्पर्धेत भाग घेणे, यात वाचन संस्कृती कुठे आली? असा प्रश्न विचारला जावू शकतो. लिहिलेले नाटक वाचून समजणे इतकाच भाग वाचन संस्कृतीत येतो असे वरकरणी वाटते. परंतु याचा प्रभावी वापर करणे शक्य आहे. उदा.- चारकोप, मुंबई येथील अक्षरा हायस्कूलमधील शिक्षकांना इजिप्शियन संस्कृती शिकवायची होती. त्यात मुलांना रस वाटावा म्हणून त्या काळावरील एक छोटासा नाट्यप्रवेश करण्याचे ठरले. मग प्रश्न उभे राहिले, त्या काळातील वेशभूषा, केशभूषा काय असावी? मग या गोष्टींसाठी मुलांनी पुरे ग्रंथालय पालथे घातले, इंटरनेटवर शोध घेतला हे सारे करत असतानाच इजिप्शियन लोकांचे राहणीमान, त्यांच्या रीती-परंपरा अशा कितीतरी गोष्टी मुलांना सहज समजल्या. यामुळे मुलांचा इतिहासाकडे पाहण्याचा नवा दृष्टीकोन विकसित झाला.
- ग्रंथालयासाठी लागणारे आर्थिक पाठबळ कोठून उभे करायचे हे शालेय नेतृत्वाला आव्हान असते. ग्रंथालयातील ग्रंथ संग्रह वाढविणे व तो अद्ययावत ठेवणे यासाठी इतर काही मार्ग अवलंबता येतात. यासाठी Room to read, Gyan-key, प्रथम यासारख्या शालेय ग्रंथालयांसाठी काम करणाऱ्या NGO ची मदत घेता येते. ग्रंथालयाच्या पुस्तकांसाठी ठाणे येथील मो. ह. विद्यालयाने आपल्या माजी विद्यार्थ्यांना आवाहन केले. त्यांनी त्यांच्याकडील वाचून झालेली पुस्तके शाळेला आनंदाने भेट दिलेली आहेत.
- आता मात्र हळूहळू पुस्तकांपेक्षा ई-पुस्तके वाचण्याकडे कल वाढत आहे. बरेचदा मुद्रित पुस्तकांपेक्षा किंडल आवृत्ती स्वस्त असते. National Digital Library ने अनेक पुस्तके ई स्वरूपात आणून देशभरातील मुलांना विनामूल्य उपलब्ध करून दिली आहेत. त्याचाही लाभ करून घेता येईल. www.arvindguptatoys.com या साईटवर वेगवेगळया भाषांमधील शेकडो पुस्तके स्कॅन करून विनामूल्य उपलब्ध केलेली आहेत. या सर्वाचा वापर आपण करु शकतो.
- Organizing School Libraries Guidelines – CBSC हे केंद्रीय विद्यालयांच्या ग्रंथालयांसाठी लिहिलेले पुस्तक सर्व प्रकारच्या शालेय ग्रंथालयांसाठी मार्गदर्शक म्हणून

उपयुक्त ठरू शकते. हे पुस्तक खालील लिंक वरुन download करता येईल : https://librarykvs.wordpress.com

**शालेय नेतृत्वासाठी मोड्यूलची उपयुक्तता -**

- समाजाच्या वेगवेगळया घटकांमधील मुलांमध्ये वाचनाची आवड व गोडी कमी होत चालली आहे याची कारणे व विवेचन यासाठी या मोडयूलची मदत होईल.
- निपुण भारत अंतर्गत वाचन-लेखन वृद्धीसाठी हे मोडयूल उपयुक्त आहे.
- शिक्षणाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी वाचन संस्कृतीचा प्रभावी वापर करण्याची शाळांना गरज आहे, तेव्हा या मोडयूलमध्ये दिलेल्या उपक्रमांचा व राबविलेल्या कार्यक्रमांचा पथदर्शक म्हणून सर्वांनाच उपयोग होईल.
- मुलांच्या वाचन, लेखन व अभिव्यक्त होण्याच्या प्रक्रियेला शालेय नेतृत्व ग्रंथालयामार्फत कसा हातभार लावू शकते याची माहिती मिळेल व शालेय नेतृत्वाचा दृष्टिकोन विकसित होईल.
- मनुष्यबळाचा सक्षम वापर, लोकसहभाग यातून समस्येचे निराकरण होण्यास मदत होते याला या मोडयूलमुळे पुष्टी मिळते.
- शाळेमध्ये विद्यार्थ्यांना शिकण्यास योग्य अध्ययन संस्कृती निर्माण करण्यासाठी ग्रंथालयांसारख्या सुविधांचा कसा प्रभावी वापर करून घेता येईल यासाठी शाळा प्रमुखांना याचा उपयोग होईल.

**वाचन संस्कृतीचे फायदे**




## समारोप –

वाचायचे कशासाठी याचे उत्तर देताना ढोबळमानाने दोन प्रकार पडतात. एक म्हणजे मनोरंजनासाठी व दूसरा ज्ञान वृद्धीसाठी. मनोरंजनासाठी वाचायच्या साहित्यात बरेचदा गोष्टीची पुस्तके, कथा, कादंबऱ्या, कविता यांचा समावेश केला जातो. बऱ्याच जणांचा ग्रंथालयाकडे पहाण्याचा दृष्टिकोन केवळ अशा प्रकारची पुस्तके वाचणे असा असतो. हा एक महत्वाचा भाग आहे, ग्रंथालयांनी तो समर्थपणे पूर्ण केला पाहिजेच परंतु बहुतेक वेळा ग्रंथालयातील संदर्भ व इतर वाचनसाहित्य याचा वापर जास्त प्रमाणात होत नसल्याचे दिसते. यासाठी मुलांमध्ये एखादा विषय वाचून समजावून घेण्याची सवय निर्माण करणे आवश्यक आहे. हे काम केवळ ग्रंथालयाचे नाही, अशा प्रकारचे साहित्य हाताळण्याची, शोधण्याची सवय विद्यार्थामध्ये निर्माण होण्यासाठी शिक्षकांनीही प्रोत्साहित केले पाहिजे. यासाठी अभ्यासक्रम शिकविताना ग्रंथालयाचा संदर्भीय वापर करणे यासाठी ग्रंथपाल व शिक्षक यांच्यामध्ये सुसंवाद असणे महत्वाचे आहे. अशाप्रकारे कार्यरत असणारे शालेय नेतृत्व शाळास्तरावरील वाचन संस्कृती टिकविण्यासाठी महत्वाची भूमिका बजावेल असे वाटते.

## संदर्भ साहित्य –


1. लवटे सुनीलकुमार : वाचन, कोल्हापूर, भाग्यश्री प्रकाशन, 2019
2. नरगुंदे रेवती : ग्रंथालये आणि सामाजिक विकास, पुणे, युनिव्हर्सल प्रकाशन, 2002
3. वीर धर्मराज : परिपूर्ण शालेय ग्रंथालये - काळाची गरज, ग्रंथपरिवार, जुलै
4. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020

**वेबसाईट्स आणि लिंक्स –**

a. https://mr.m.wikipedia.org
b. https://mr.m.wikisource.org
c. https://www.vachanmitra.com/
d. http://ncsl.niepa.ac.in/sla-module.php
e. http://ncsl.niepa.ac.in/


**मोडयूल विकसक**
श्रीम. शिल्पा कुलकर्णी
ग्रंथपाल
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, ठाणे

**समन्वयन**
डॉज्योती कुलकर्णी.
समन्वयक
महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा), औरंगाबाद

**मार्गदर्शक**
श्रीरमाकांत काठमोरे.
संचालक
महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा),औरंगाबाद